# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ सा.प्र. /३२/2025-26 दि.१६/ ४/2025

**प्रति,**

**मा.सिस्टीम मॅनेजर सो.**

**माहिती तंत्रज्ञान विभाग**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- मनपा मार्फत खाजगी ठेकेदारासोबत केलेल्या कंत्राट व इतर माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**
**(तक्रारीचे टोकन क्र. Dis/urdm/than/२०२३/१३९)**

**संदर्भ :- जा.क्र.मनपा.माहिती व तंत्रज्ञान/३६/२०२५-२६ दि.११/०४/२०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मिरा- भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर सामान्य प्रशासन विभागाची माहिती वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येते.

तरी, सामान्य प्रशासन विभागा मार्फत कोणताही खाजगी करारनामा केलेला नसल्याने ईकडील विभागाची माहिती निरंक आहे.

जितेंद्र कांबळे
कार्यालयीन अधिक्षक
मिरा भाईंदर महानरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१
माहिती व तंत्रज्ञान विभाग
दूरध्वनी : ०२२-२८१९२८२८ (Ext.251), ई-मेल : it@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/ माहिती व तंत्रज्ञान / 3६ / 2025-26 — दि.११/०४/२०२५

प्रति,
सर्व विभाग प्रमुख
मिरा-भाईंदर महानगरपालिका

विषय :- मनपा मार्फत नेमलेल्या खाजगी ठेकेदारांसोबत केलेल्या कंत्राट करार व इतर माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत. (तक्रारीचे टोकन क्र.DIS/URDM/THAN/2023/139)

संदर्भ :-
1) No.Letter/Commissioner/MBMC/७१/२०२३, दि.१०/०४/२०२३ रोजीचे श्री. कृष्णा सी. गुप्ता यांचे पत्र.
2) जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/29/2023-24 दि. 13/04/2023 रोजीचे पत्र.
3) उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, कोकण भवन यांचेकडील पत्र क्र.नपाप्र/कार्या-4/आपले सरकार/2024, दि.27/03/2025.
4) जा.क्र. मनपा/आस्था/09/2025-26 दि.08/04/2025 रोजीचे पत्र.
5) जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/388/2024-25 दि. 10/01/2025 रोजीचे पत्र.
6) जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/395/2024-25 दि. 15/01/2025 रोजीचे पत्र.
7) जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/452/2024-25 दि. 12/02/2025 रोजीचे पत्र.
8) जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/486/2024-25 दि. 06/03/2025 रोजीचे पत्र.
9) जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/10/2025-26 दि. 02/04/2025 रोजीचे पत्र.
10) जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/14/2025-26 दि. 03/04/2025 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या वेबसाईटवर महानगरपालिकेची माहिती वेळोवेळी अद्ययावत करून प्रसिद्ध करण्यात येते.

याकामी आपल्या विभागाची अद्यावत माहिती सादर करणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये आपल्या विभागाकडील सध्या सुरू असलेले नवीन प्रकल्प तसेच नव्याने काही धोरणात्मक निर्णय घेतले असल्यास (फोटोसहीत) त्याची माहिती, विभागाची कामकाज पद्धती तसेच विभागा अंतर्गत घेण्यात आलेले महत्त्वाचे निर्णय इत्यादी वेबसाइटवर प्रसिद्ध करण्याकरता सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार जी माहिती वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे (उदा. नागरिकांची सनद, माहिती अधिकार इत्यादी) माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत 4(1)(ख) 1-17 नुसार माहिती स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची माहिती, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 60 अन्वये 13 मुद्याची माहिती. मिरा-भाईंदर महानगरपालिका मार्फत नेमलेल्या खाजगी ठेकेदारांसोबत केलेल्या कंत्राट करार व इतर माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत श्री. कृष्णा सी. गुप्ता यांचे वरील संदर्भिय पत्र प्राप्त झाले आहे. संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची अद्यावत माहिती या विभागात मराठी व इग्रंजी भाषेत (unicode मध्ये) Pdf तसेच text मध्ये सादर करणेबाबत सर्व विभागांना वरील संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये लेखी कळविले आहे. त्या अनुषंगाने सदर माहिती २ दिवसांच्या आत उपलब्ध करण्यात यावी.

**महत्वाची सुचना :** प्रसिध्द करावयाची सॉफ्टकॉपी समर्पक caption सह, मराठी व इग्रंजी भाषेत (unicode मध्ये) Pdf तसेच text मध्ये उपलब्ध करण्यात यावी.

**सोबत :** श्री. कृष्णा सी. गुप्ता यांचे पत्र.

(राजकुमार एम.घरत)
सिस्टीम मॅनेजर
माहिती तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:
श्री. कृष्णा सी. गुप्ता.
प्रत :
मा. आयुक्त सो.
मा. अति. आयुक्त
मा. उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान विभाग)

Z:\F drive\मनपा मार्फत नेमलेल्या खाजगी ठेकेदारांसोबत केलेल्या कंत्राट करार व इतर माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत